# समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका

## जाहीर प्रकटन सन २०२४-२०२५

महिला व बाल कल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना या योजनांअंतर्गत युवक, युवती, महिला, पुरूषांकडून खालील योजनांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | मुख्य योजनांच्या अंतर्गत येणाऱ्या योजनांचा विषय | तपशिल |
|---|---|---|
| | **महिला व बाल कल्याण योजना** | |
| १ | लाडकी लेक (मुलगी दत्तक) योजना | मुलगी जन्मास आल्यानंतर १ वर्षाचे आत लाभ देणेत येतो. या योजना अंतर्गत पालकाने लोकसहभागातून जमा केलेली अथवा स्वतःची र.रू.१० हजार व पुणे महानगरपालिकेची र.रू.२००००/-असे एकूण र.रू.३० हजार राष्ट्रीयकृत बँक/डाक विभागाकडील किसान विकास पत्र/दिर्घ मुदतीची गुंतवणूक योजना मध्ये मुलीच्या नावे दामदुप्पट योजनेत गुंतविणेत येईल. तसेच या योजना अंतर्गत फक्त एका मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असल्यास पालकाने लोकसहभागातून अथवा स्वतःची जमा केलेली रक्कम रू. १० हजार व पुणे महानगरपालिकेचा हिस्सा र.रू.२००००/-च्या दुप्पट (र.रु.४००००/-) असे एकूण र.रू.५० हजार राष्ट्रीयकृत बँक/डाक विभागाकडील किसान विकास पत्र/दिर्घ मुदतीची गुंतवणूक योजना मध्ये मुलीच्या नावे दामदुप्पट योजनेत गुंतविणेत येईल. |
| २ | विधवा महिलांना अर्थसहाय्य | घरातील कर्त्यापुरूषाचे निधन झाल्यास त्याचे विधवा पत्नीस रू.१५,०००/- अनुदान (एकदाच) देणेची योजना आहे. मृत व्यक्तिचे वय १८ ते ६५ वर्षाच्या दरम्यान असावे. मृत्यू झाल्यानंतर २ वर्षाच्या आत अनुदानाचा अर्ज सादर करणे बंधनकारक राहिल. |
| ३ | मातारमाई स्वावलंबनयोजने अंतर्गत सर्व स्तरा तील विधवा, परितक्त्या,निराधार महिलांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता अर्थसहाय्य | केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजना अंतर्गत लाभ घेत नसलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रक्कम रू.१०००/- प्रमाणे वार्षिक रक्कम रू.१२०००/- देण्यात येईल.. |
| | **मागासवर्गीय कल्याणकारी योजना** | |
| १ | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता सायकल सुविधा | (फक्त मागासवर्गीयांसाठी) सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण होवून किमान इयत्ता ११वी तसेच त्यापुढील वर्गात मान्यताप्राप्त कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेशघेतलेल्या विद्यार्थ्यांना अगोदरचे परिक्षेमध्ये ५०%गुण मिळाले असल्यास तसेच घरापासून महाविद्यालयाचे अंतर २ कि.मी.पेक्षा जास्त असल्यास सायकल घेणेकरीता अर्थसहाय्य देणेत येते |
| २ | पुणेमनपातील घाणभत्ता मिळणाऱ्या मागासवर्गीय सेवकांचे मुलांसाठी अर्थसहाय्य | पुणे मनपातील घाणभत्ता मिळणाऱ्या मागासवर्गीय सेवकांचे मुलांसाठी (इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना) शैक्षणिक अर्थसहाय्य देणेत येते. |
| ३ | पुणे मनपाहद्दीतील कचरावेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित कामकरणाऱ्या सर्व असंघटीतकष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य | पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना (इ. ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी) शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य देणेत येते. |
| ४ | व्यसन मुक्तिसाठी अर्थसहाय्य | पुणे मनपा हद्दीतील १८ ते ४५ वयोगटातील व्यक्ती अंमली पदार्थांच्या आहारी गेल्यास त्यांना त्या पासून मुक्त करणेसाठी शासनमान्य अथवा मान्यता प्राप्त व्यसनमुक्ति केंद्रात उपचारासाठी रू. ७०००/- पर्यंत अनुदान देण्यात येते (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| ५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त माता रमाई भिमराव आंबेडकर योजने अंतर्गत गवनि घोषीत व शहरी गरीब योजनेतील पात्र ठरणाऱ्या विधवा, निराधार महिलांसाठी प्राथमिक आरोग्य संगोपन करीता अर्थसहाय्य | केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व संजय गांधी निराधार अनुदान योजना अंतर्गत लाभ घेत नसलेल्या लाभार्थ्यांना दरमहा रक्कम रू.१०००/- प्रमाणे वार्षिक रक्कम रू.१२०००/- देण्यात येईल. |
| ६ | झोपडी दुरूस्ती | पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना झोपडी दुरूस्तीसाठी रू.१०,०००/- पर्यंत अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| ७ | वैयक्तिक नळ कनेक्शन | पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना नळ कनेक्शनसाठी रू.५०००/- पर्यंत अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| ८ | वैयक्तिक वीज कनेक्शन | पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना विज कनेक्शनसाठी रू.५०००/-अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |
| ९ | वैयक्तिक शौचालय बांधणे | पुणे मनपा हद्दीतील नागरीकांना वैयक्तिक शौचालय बांधणेकरीता रू.१५,०००/- पर्यंत अनुदान दिले जाते. (फक्त मागासवर्गीयांसाठी) |

| अ. क्र. | मुख्य योजनांच्या अंतर्गत येणाऱ्या योजनांचा विषय | तपशिल |
|---|---|---|
| | | दिव्यांग कल्याणकारी योजना |
| १ | अपंग (दिव्यांग) व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य | पुणे मनपा हद्दीतील अपंगांना (दिव्यांग) स्वयंरोजगार करणेसाठी रू.१५०००/- अर्थसहाय्य दिले जाईल. |
| २ | अपंग (दिव्यांग) व्यक्तींना अल्पकालिन व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी अर्थसहाय्य | ज्या अपंग (दिव्यांग) व्यक्तिंना समाज विकास विभागामार्फत सुरू असलेल्या व्यवसाय प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण घेणे अडचणीचे असल्यास शासनमान्य अधिकृत संस्थेत प्रवेश घेतला असेल अशा संस्थेस जास्तीत जास्त र.रू.१०,०००/- किंवा संस्थेची प्रशिक्षणा साठी असणारी फी या पैकी जी रक्कम कमी असेल ती प्रशिक्षण खर्चापोटी देणेत येईल. |
| ३ | अपंग (दिव्यांग) विद्यार्थ्यांना दीर्घ मुदतीचे शैक्षणिक वा तांत्रिक अभ्यासक्रमासाठी अर्थसहाय्य | जे अपंग (दिव्यांग) विद्यार्थी इ. १० व इ. १२ वी नंतर तांत्रिक, वैद्यकिय, इंजिनिअरींग, व्यवस्थापकीय, संगणकीय किंवा इतर उच्च शिक्षणासाठी किंवा विद्यापीठ मान्यता प्राप्त तांत्रिक कोर्सला प्रवेश घेतील अशा अपंग (निःसमर्थ) विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कालावधीत रू.२०,०००/- अर्थसहाय्य दिले जाईल.तसेच ज्या संस्थेत प्रवेश घेतला असेल ती संस्था शासनमान्य असणे बंधनकारक राहिल. |
| ४ | अंध,अपंग(निःसमर्थ),विकलांग,मुकबधिर व्यक्तिंनाकृत्रिम अवयव घेणेसाठी योजना | अंध,अपंग (दिव्यांग),विकलांग,मुकबधिर व तत्सम अपंग(दिव्यांग)व्यक्तिंना आपले दैनंदिन काम करताना उपयोगी पडणारे कृत्रिम साधनांसाठी रू.२०,०००/-अर्थसहाय्य देणेत येईल. |
| ५ | महापालिका क्षेत्रातील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या मनपा हद्दीतील नोंदणीकृत स्वयं सेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य | पुणे महानगरपालिका परिसरात वास्तव्य असलेल्या किमान १५ मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करण्याकरिता नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस प्रति मतिमंद व्यक्तीकरिता र. रू.२४,०००/- वार्षिक अर्थसहाय्य अदा करण्यात येईल अथवा महापालिका हद्दीतील वास्तव्य असणाऱ्या मतिमंद व्यक्तीच्या पालकास आपल्या पाल्याच्या पालन-पोषण करण्याकरिता एकूण र. रू.२४,०००/- वार्षिक अर्थसहाय्य अदा करणेत येईल. |
| ६ | दिव्यांग-दिव्यांग, दिव्यांग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य | किमान ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा दिव्यांग नसलेल्या वधू किंवा वराने दिव्यांग असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास किंवा दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्व असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास विवाहासाठी र.रू.३०,०००/- एकदाच अर्थसहाय्य देण्यात येईल. विवाहाच्या तारखे पासून एक वर्षाच्या आत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. |
| ७ | दिव्यांगव्यक्तींनी स्थापित केलेल्या कला पथकास वाद्य खरेदीसाठी अर्थसहाय्य | दिव्यांग व्यक्तीनी स्थापित केलेल्या कला पथकास र. रु. ५० हजार पर्यत एकदाच अर्थसहाय्य देणे आहे. कलापथकामध्ये किमान ५ सदस्य असणे आवश्यक आहे. |
| ८ | दिव्यांग व्यवसाय गटांनी सुरु केलेल्या व्यवसायाच्या वृद्धी करिता अर्थसहाय्य | व्यवसाय वृद्धी होणे करिता भांडवली खर्चासाठी रक्कम रु. २५ हजार पर्यंत अर्थसहाय्य देणेत येईल. दिव्यांग बचत गटांतील ५ सदस्यांनी एकत्र येवून व्यवसाय गट स्थापन केला असणे आवश्यक आहे. |
| ९ | किमान ६०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना वार्षिक अर्थसहाय्य | पुणे मनपाहद्दीत राहणाऱ्या हद्दीतील कार्यात्मक/क्रियात्मक दिव्यांगत्व(अंधत्व, अल्पदृष्टी, कर्णबधीर(बहिरेपण व कमी ऐकू येणे),लोकोमोटर डिसअबिलिटी,ठेंगुपणा,इन्टेलेक्च्युअल डिस-अबिलिटी,ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर,सेरेब्रल पाल्सी,मस्क्यूलर डिस्ट्रॉफी, दीर्घ-कालीन मज्जासंस्था विकार,विशिष्ट शैक्षणिक अपंगत्व,कुष्ठपिडीत,मल्टिपल स्केले- रोसिस, संभाषण व भाषा अपंगत्व,थॅलासेमिया,हिमोफिलीया,सिकल सेल डिसीज, कर्णबधीर-अंधत्व,यांसह विविध प्रकारचे अंधत्व,ॲसिड हल्ला झालेली व्यक्ती, पार्किन्सन्स डिसीज) असलेल्या व्यक्तीस दरमहा र.रू.२०००/-प्रमाणे वार्षिक र.रु.२४,०००/- अर्थसहाय्य देणेत येईल. |
| १० | कुष्ठ पिडीत व १००% अतितीव्र अपंग(निःसमर्थ)व्यक्ती करिता वार्षिक अर्थसहाय्य योजना | महापालिका हद्दीतील १८ वर्षे पूर्ण व त्या पुढील वयाच्या कार्यात्मक/क्रियात्मक अपंगत्व (निःसमर्थ) असलेल्या कुष्ठ पिडीत व १००% अतितीव्र अपंग (निःसमर्थ) व्यक्तीस वार्षिक रक्कम रू. १२,०००/- अर्थसहाय्य देणेत येईल. |
| | | युवक कल्याणकारी योजना |
| १ | तृतीयपंथी यांना स्वयंरोजगारा साठी अनुदान देणे. | एकदाच र.रू.१००००/-पर्यतअथवासादर केलेल्या कोटेशन मधील र.रू.१००००/-पेक्षा कमी असल्यास जी रक्कम कोटेशनमध्ये नमूद आहे तेवढी रक्कम अनुदान म्हणून देणेत येईल |
| २ | वयोमर्यादा ४५ व त्या पुढील तृतीयपंथी | वयोमर्यादा ४५ व त्या पुढील तृतीयपंथी यांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा |

| अ. क्र. | मुख्य योजनांच्या अंतर्गत येणाऱ्या योजनांचा विषय | तपशिल |
|---|---|---|
| | यांना प्राथमिक आरोग्य संगोपन करीता दरमहा अर्थसहाय्य देणे. | रक्कम रू.१०००/- प्रमाणे वार्षिक रक्कम रू.१२,०००/- अर्थसहाय्य देण्यात येईल व सदर अर्थसहाय्य आर.टी.जी.एस. द्वारा बँक खात्यामध्ये जमा करणेत येईल. |
| ३ | पुणे मनपा हद्दीतील तृतीयपंथी व्यक्तींच्या बचत गटांना खेळते भांडवल म्हणून अर्थसहाय्य देणे. | पुणे महानगरपालिका हद्दीतील तृतीयपंथी व्यक्तींच्या बचत गटांना किमान ६ महिने पुर्ण झालेल्या बचतगटांना खेळते भांडवल म्हणून रक्कम रू.१५०००/- अर्थसहाय्य देणेत येईल. |
| | | **महिला बाल कल्याण व मागासवर्गीय कल्याणकारी योजना** |
| १ | कमवा व शिका | सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात इ.१०वी उत्तीर्ण होवून त्या पुढील शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत दरमहा शैक्षणिक अर्थसहाय्य देणेत येते. यासाठी मागील वर्षात ५०% गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| | | **महिला बाल कल्याण व मागासवर्गीय कल्याणकारी व युवक कल्याण कारी योजना** |
| १ | स्वयंरोजगारासाठी अनुदान | १८ ते ४५ वयोगटातील स्त्रीयांना स्वत:चा स्वयंरोजगार सुरू करावयाचा असल्यास अथवा सुरू असलेल्या व्यवसाय वाढीसाठी एकदाच अर्थसहाय्य देणेत येते. सदर योजनेत खुला व मागासवर्गीय प्रवर्गातील महिलांना अर्ज करता येतील. परंतू ज्या मागासवर्गीय महिलांकडे जातीचा दाखला आहे. त्यांनी मागासवर्गीय कल्याणकारी योजनेत अर्ज करावा. |
| | | **महिला बाल कल्याण व मागासवर्गीय कल्याणकारी योजना** |
| | इ. १० वी तील विद्यार्थ्यां साठी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य | इ. ९ वीमध्ये ५०% वा त्या पेक्षा अधिक गुण मिळाले असल्यास व वाल्मिकी समाजातील ४५% वा त्या पेक्षा अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना इ. १० वीमध्ये प्रवेश घेतला असल्यास खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य देणेत येते. |
| | | **महिला बाल कल्याण, मागासवर्गीय कल्याणकारी व युवक कल्याणकारी योजना** |
| १ | इ. १२ वी तील विद्यार्थ्यां साठी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य | सन२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण होवून इ.१२वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना (इ.११ वीत६०% वा त्यापेक्षा अधिक गुण मिळणे आवश्यक)खाजगी क्लास करिता अर्थसहाय्य देणे येते.फक्तकॉमर्स व शास्त्रशाखेतील विद्यार्थ्यानीच अर्ज करावेत. |
| २ | सी. ई. टी. परिक्षेस बसण्यासाठी अर्थसहाय्य | सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण होवून इ.१२ वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सी.ई.टी. परिक्षे करीता प्रवेश शुल्कासाठी अर्थसहाय्य देणेत येते. इ.११ वीत ६०% वा त्या पेक्षा अधिक गुण मिळणे आवश्यक. |
| ३ | उच्च व्यावसायिक तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य | वैद्यकिय,इंजिनिअरिंग,व्यवस्थापन,संगणकीय इ. शाखांच्या पदविका,पदवी,पदव्युत्तर, अभ्यासक्रमास शासनमान्य शिक्षण संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना (पदवी (डिग्री)/ पदविका (डिप्लोमा) च्या प्रथम वर्षी ६० टक्के वा त्यापेक्षा अधिक गुण मिळणे आवश्यक) शैक्षणिक अर्थसहाय्य देणेत येते. |
| | | **मागासवर्गीय कल्याणकारी व युवक कल्याणकारी योजना** |
| १ | परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुदान | पुणे मनपा हद्दीतील त्या त्या आर्थिक वर्षात परदेशात उच्च शिक्षण (पदवी नंतरच्या वैद्यकीय/अभियांत्रिकी/संगणकीय/व्यवस्थापन/विधी/वाणिज्य इ.)घेण्यासाठी जाणाऱ्या मागासवर्गीय पाच विद्यार्थ्यांना तसेच आर्थिक दुर्बल घटकातील पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी रक्कम रूपये दोन लाख एकदाच अर्थसहाय्य देणेत येते. |

**वरील मागासवर्गीय कल्याणयकारी योजनेमधील अ.क्र. ६ ते ९ ची अंमलबजावणी क्षेत्रिय कार्यालयामार्फत केली जाईल.**

उपरोक्त योजनांचे अर्ज दि.२४ जून २०२४ ते दि.२९ सप्टेंबर २०२४ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने **dbt.pmc.gov.in** या संकेतस्थळावरती भरणेत यावेत. तसेच याबाबतचा तपशील व अटी व शर्ती या पुणे मनपाच्या **dbt.pmc.gov.in** या संकेतस्थळावरती बघण्यात यावे. अधिक माहितीसाठी संपर्क क्र. १८००१०३०२२२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

(नितीन उदास)
उप आयुक्त
समाज विकास विभाग, पुणे मनपा